Vol 5 Issue 10 April 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 10 | April - 2016

Golden Research Thoughts



GRT

# ज्ञानोदय वृत्तपत्रातील दुष्काळ व शेतीसंबंधीचे विचार (1842 ते 1850) ऐतिहासिक अभ्यास

प्रा. रूपाली भोसले
इतिहास विभाग, मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता. बारामती,

## प्रास्ताविक

प्राचीन काळापासून भारतात प्रामुख्याने शेती व्यवसाय केला जातो. म्हणून आजही भारताला कृषिप्रधान देश म्हणून संबोधले जाते. परंतु शेती ही निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते. त्याचाच एक भाग म्हणजे सध्या महाराष्ट्र राज्यात सातत्याने होणाऱ्या शेतकऱ्यांच्या दुर्दैवी आत्महत्या, पावसाने फिरवलेली पाट, सातत्याने पडणारे दुष्काळ, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, वाढती महागाई, बोकाळलेला भ्रष्टाचार, शेती मालाला नसणारा हमी भाव अशा अनेक प्रश्नांमुळे महाराष्ट्रातील शेती व्यवसाय अडचणीत सापडलेला आहे. 19 व्या शतकातील महाराष्ट्रात शासन आणि जनता यांच्यामध्ये दुवा साधन्याचे कार्य तसेच लोकशिक्षण व प्रबोधनाचा प्रसार करण्याचे कार्य वृत्तपत्रांनी प्रभावीपणे केलेले दिसते. सुरूवातीच्या मराठी वृत्तपत्रापैकी 'ज्ञानोदय'[1] हे वृत्तपत्र जून 1842 मध्ये अहमदनगर येथून अमेरिकन मराठी मिशनने केले.

ज्ञानोदय वृत्तपत्राने महाराष्ट्राच्या समाजप्रबोधनात महत्त्वाची भूमिका निभावली होती. अमेरिकन मराठी मिशनने धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात ज्ञानोदय वृत्तपत्र सुरू करून क्रांतिकारी पाऊल टाकले होते. याचे महत्त्व विशद करताना प्रा. गंगाधर बाळकृष्ण सरदार म्हणतात, ''ज्ञानोदय हे ख्रिस्ती नियतकालिक आहे असे म्हणतात, ते बरोबर नाही.... त्यात कितीतरी इतर माहिती आलेली आहे. ती बिनचूकपणे देण्याच्या बाबतीत आपण त्या संपादकांना आणि त्याहीपेक्षा इंग्रज किंवा अमेरिकन मंडळीच्या संशोधनवृत्तीचे खरोखर कौतुक केले पाहिजे..... महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास लिहायचा असेल तर 'ज्ञानोदय' शिवाय दुसरे साधन नाही.''[2] अहमदनगर सारख्या अवर्षणग्रस्त भागातील सर्वसामान्य नागरीकांमध्ये, शेतकऱ्यांमध्ये सुधारणा व्हावी यासाठी ज्ञानोदयने प्रभावीपणे विचार मांडले होते आणि म्हणूनच 'ज्ञानोदय वृत्तपत्रातील दुष्काळ व शेतीसंबंधीचे विचार (1842 ते 1850) : ऐतिहासिक अभ्यास' हा विषय सदर शोधनिबंधासाठी निवडलेला आहे.




## 19 व्या शतकातील महाराष्ट्रामधील स्थित्यंतर

एकोणिसावे शतक हा महाराष्ट्राचा किंबहुना भारताच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा होता. या कालखंडात भारतात व महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेचा उदय आणि विकास घडून आला होता. याच कालखंडात सामाजिक सुधारणांना सुरूवात झाली. आधुनिक शिक्षण पद्धती आली. त्यामुळे महाराष्ट्रातील सारे वातावरण ढवळून निघाले. त्यामुळेच आधुनिक भारताच्या पायाभरणीचे शतक म्हणून या शतकाचा उल्लेखही केला जातो. हे सर्व बदल होण्यात आधुनिक शिक्षणाचा व वृत्तपत्रांचा वाटा मोठा होता..

अशा या अर्थपूर्ण कालखंडाचा अभ्यास करताना सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक संदर्भ लक्षात घेणे आवश्यक आहे. इतिहासात केवळ घटनांचे तपशील अभ्यासून चालत नाही, तर घटनांशी संबंधित विचार आणि विचारव्यूह समजाऊन घ्यावे लागतात. 19 व्या शतकात सामाजिक स्थित्यंतराबरोबर आर्थिक स्थित्यंतरालाही गती मिळण्यास सुरूवात झाली. या सर्व स्थित्यंतरामध्ये वृत्तपत्रांनी महत्त्वाचे कार्य केले.

## ख्रिश्चन धर्मप्रसारकांचा भारतात प्रवेश

युरोपीय व्यापाऱ्यांबरोबर गोऱ्या लोकांवरील ओझे कमी करण्यासाठी, ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी काही मिशनरी भारतात

आले. 19 व्या शतकापर्यंत धर्मप्रसारकांची संख्या मर्यादित होती. परंतु 1813 च्या चार्टर ॲक्टनुसार ख्रिश्चन धर्मप्रसारकांना म्हणजेच ख्रिश्चन मिशनऱ्यांना भारतात धर्मप्रसार करण्याची सवलत देण्यात आली. त्यामुळे वेगवेगळ्या देशांचे मिशनरी भारतात येऊ लागले आणि धर्मप्रसाराचे कार्य शहरात व गावोगावी करण्यास सुरूवात झाली.

भारतामध्ये पोर्तुगीज, डच, फ्रेंच, डेन, ब्रिटिश, अमेरिकन इत्यादी मिशनरी आले होते. त्यांचा मुख्य उद्देश भारतामध्ये धर्मप्रसार करणे हा होता. तो उद्देश साध्य करण्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या माध्यमांचा अवलंब केला होता. त्यामध्ये वैद्यकीय सुविधा, शिक्षण, वृत्तपत्र इत्यादींचा समावेश होता.

### *वृत्तपत्रांचा उदय*

भारतात समाजामध्ये सुधारणा करण्याच्या कामात एतद्देशीय सुधारक, मिशनरी व ईस्ट इंडिया कंपनी याबरोबरच वेगवेगळ्या वृत्तपत्रांनी देखील महत्त्वाची भूमिका बजावली होती. भारतामध्ये 1780 मध्ये 'बेंगाल गॅझेट' हे वृत्तपत्र प्रथम निघाले. पुढे अनेक वृत्तपत्रे निघालेली दिसतात. यामध्ये कलकत्ता गॅझेट, बेंगाल जर्नल, ओरिएन्टल मॅगेझिन, कलकत्ता क्रॉनिकल, दि मद्रास कुरिअर, इंडिया हेरॉल्ड इत्यादी वृत्तपत्रे भारतात निघाली होती. पुढे मुंबई इलाख्यात देखील वृत्तपत्रे निघाली. मुंबई इलाख्यामध्ये बॉम्बे हेरॉल्ड, बॉम्बे कुरिअर, मुंबई समाचार, मुंबापूर इत्यादी वर्तमानपत्रे निघालेली होती.

मराठी भाषेत दर्पण (1832), मुंबई अखबार (1840), दिग्दर्शन (1840), ज्ञानचंद्रोदय (1840), प्रभाकर (1841), ज्ञानसिंधू (1842), ज्ञानोदय (1842), वर्तमानदर्श (1842), उपदेश चंद्रिका (1844), बोधसागर (1849), ज्ञानप्रकाश (1849), मराठी ज्ञानप्रसारक (1850), विचार लहरी (1852), धूमकेतु (1853) इत्यादी मराठी वर्तमानपत्रे मुंबई इलाख्यात निघू लागली.

### *ज्ञानोदय वृत्तपत्र*

मिशनरी भारताच्या ज्या–ज्या प्रदेशात गेले, तेथे तेथे त्यांनी स्थानिक भाषेत वृत्तपत्रे काढली. अहमदनगरला स्थायिक झालेल्या अमेरिकन मराठी मिशनरीने 'ज्ञानोदय' हे वर्तमानपत्र जून 1842 मध्ये सुरू केले. 'ज्ञानोदय'चे मासिक, पाक्षिक व साप्ताहिकामध्ये रूपांतर झाले. आता ते त्रैमासिक आहे. आजपर्यंत 'ज्ञानोदय'चे प्रकाशन कधी थांबले नाही.

'ज्ञानोदय' हे ग्रामीण भागातील पहिले मराठी भागातील पहिले मराठी वृत्तपत्र सुरू करण्यापाठीमागे ज्ञानोदयकर्त्याचा उद्देश 'धर्मप्रसार करण्याच्या कामामध्ये सुकरता यावी' हा होता. त्याचबरोबरीने ज्ञानोदय वृत्तपत्राने एतद्देशीय समाजामध्ये प्रबोधन घडविण्याचे काम केलेले होते. 'ज्ञानोदय वृत्तपत्रातील दुष्काळ व शेतीसंबंधीचे विचार (1842 ते 1950) : ऐतिहासिक अभ्यास' हा त्यापैकीच एक घटक शोधनिबंधासाठी निवडलेला आहे..

### *दुष्काळ व शेतीसंबंधी ज्ञानोदयचे विचार*

महाराष्ट्रातील शेती ही पावसावर अवलंबून असल्यामुळे महाराष्ट्रात दुष्काळी स्थिती सातत्याने पहावयास मिळते. 19 व्या शतकात महाराष्ट्रात पावसाअभावी शेती आणि शेतकरी यांची कशी दूर्दशा झालेली होती. यासंदर्भात ज्ञानोदय वृत्तपत्रात सातत्याने बातम्या, लेख छापलेले दिसतात.

सन 1844 ते 1846 दरम्यान महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट निर्माण झाल्याचे दिसते. 1 जानेवारी 1847 च्या 'आयात–निर्यात' या अंकात बातमी छापली. या बातमीत सांगितले आहे की, '1844 च्या शेवटच्या पाच महिन्यात 9 लाख रूपयांचा माल आयात झाला तर निर्यात फक्त दोन लाखांची झाली.'[3] पाण्याअभावी शेतीउत्पन्न कमी झाल्यामुळे त्याचा निर्यातीवर परीणाम झालेला दिसून येतो. सन 1827 मध्ये स्थापन झालेल्या 'मुंबई ट्रस्ट आणि बूक सोसायटी'ने 1845 मराठीत प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांची नावे 20 डिसेंबर 1845 च्या अंकात ज्ञानोदय मध्ये छापलेली होती. त्या 38 पुस्तकांपैकी 20 नंबरला 'पावसासाठी प्रार्थना'[4] या नावाचे पुस्तक आहे. पाऊस फारसा झालेला नसल्यामुळे पावसासाठी प्रार्थना नावाचे पुस्तक छापल्याचे दिसते.

'पावसाचे दुर्भिक्ष' ही बातमी 15 सप्टेंबर 1845 च्या अंकात ज्ञानोदयने छापली. 'अहमनगर येथे पाऊस कमी झाला. लोक गावे सोडीत आहेत.... ज्वारीचा भात रूपयास 3 पायलीवर (एक पायली म्हणजे साधारणपणे पाच ते सहा किलोची असते) गेला.... पशूही खाणार नाहीत असे धान्य गोरगरीब जादा किंमत देऊन खाताहेत.... उधारी बुडते आहे...'[5] असे या बातमीत दुष्काळाचे परीणाम छापले. त्यासंदर्भात 'धान्य महागाईवर उपाय' या बातमीत 'धान्याच्या महागाईवर तोंड देण्याकरिता मिलिटरी बोर्ड पैसा जमवून साठा करणार...'[6] असा महागाईवर सरकारी निर्णय छापून रयतेत आशावाद निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. 15 सप्टेंबर 1846 च्या अंकात सरकारने 1846 मध्ये 'कापूस पीक कमी आले म्हणून चौकशी कमिटी नेमली.'7 ही बातमी ज्ञानोदयने छापली. म्हणजेच पावसाअभावी कापसाचे पीक कमी प्रमाणात निघाले असावे.

महाराष्ट्राबरोबर बंगाल इलाख्यात देखिल दुष्काळ पडल्याचे पुढिल बातमीवरून लक्षात येते. 'बंगाली रयतेची अवस्था' या बातमीत बंगाली रयतेचे विदारक वर्णन केलेले आहे. 'खाण्यात फक्त भात आणि अंगावर अल्प वस्त्र अशी बंगाली रयतेची स्थिती आहे... मासळी म्हणजे मेजवानी वाटते. घर तर केवळ छप्परच वाटते... जमीनदार लोक सामांन्य रयतेवर फार जुलूम करतात. कारण शिक्षणाचा प्रसार झालेला नाही. देवविषयक कल्पना चुकीच्या असल्याने बिचारे सतत दुःख भोगीत आहेत...'[8] म्हणजेच या काळात महाराष्ट्राबरोबर भारताच्या इतर प्रांतातदेखील दुष्काळाचे सावट निर्माण झाल्याचे दिसून येते.

### *दुष्काळ निवारण व शेतीस उत्तेजन देण्यासंबंधी ज्ञानोदयचे विचार*

प्रजेच्या कल्याणासाठी, दुष्काळ निवारण्यासाठी शासनाने केलेले प्रयत्न व अजून शासनाने काय उपाययोजना करावी, शिवाय दुष्काळा सदृश्य परिस्थितीत प्रजेने, रयतेने काय करावे यासंदर्भात ज्ञानोदयमध्ये सातत्याने लेख, बातम्या छापल्या जात होत्या.

'व्यापार व शेती यांची सुधारणूक' यासंबंधी सरकारचा जाहिरनामा 15 एप्रिल 1847 च्या अंकात छापला आहे. मुंबई इलाख्यातील व्यापारी जिनसाचे व शेतीकामाचे व सुधारणुकीविषयी उत्तेजन होण्याकरता बक्षिस देण्याविषयीचा जाहीरनामा.[9] सरकारला शेती व व्यापारातून महसूल जास्त मिळावा म्हणून सुधारणा करण्यावर भर देवून शेतकऱ्यांस उत्तेजन देण्याचा प्रयत्न शासनाचा दिसतो.

'कापसावरील निर्यात कर रद्द' हा शासनाचा निर्णय 15 जानेवारी 1848 च्या अंकात छापला आहे. 'इंग्रज सरकारने कापसाच्या निर्यातीवरील जकात रद्द केली आहे. जेणेकरून कापसाचे पीक या देशात अधिक होऊ शकेल. कापूस साफ करण्याचे यंत्रही इंग्लंडहून आणले जाईल.'[10] कापूस पीकास उत्तेजन देण्यासाठी ही बातमी छापलेली दिसते.

रयतेची दुर्दशा आणि त्यासाठी उपाय याविषयावरील बातमी 16 फेब्रुवारी 1846 च्या अंकात छापली आहे. ज्ञानोदयकर्ते असे लिहितात की, 'दक्षिण देशांतील लोकांची दुर्दशा टळावी म्हणून एथे शेकडो बांध आहे. परंतु हल्ली असे मोडले आहेत की त्याचा उपयोग पडत नाही, तर एथील हजारो गरीबगुरीब जे भुकेने मरतात त्यांस रोजीप्रमाणे दोन आणे देऊन ह्या कामास लावावे...'[11] अशा स्वरूपाची बातमी देऊन ज्ञानोदयने जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी गरीबांच्या हाताला काम देण्याची मागणी शासनाकडे केलेली दिसते. याच स्वरूपाची दुसरी एक बातमी ज्ञानोदयने 16 मार्च 1846 मधील अंकात छापली होती. 'रयतेची दूर्दशा आणि त्यासाठी उपाय... दर घरास एक एक नांगर बैलाची जोडी दिली पाहिजे.'[12] शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने केवळ त्यांच्या हाताला काम देऊन उपयोग नाही तर शेतीचा विकास करावयाचा असेल तर रयतेला बैलांची जोडी देऊन मदत केली पाहिजे अशी मागणी ज्ञानोदयने केली आहे.

शेतकऱ्यांनी शेतीत व्यापारी पिके घ्यावित यासाठी कंपनी सरकारने शेतकऱ्यांना आवाहन करून विक्रमी उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांस बक्षिस जाहीर केलेले होते. विक्रमी उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांना सरकारने बक्षिस न दिल्यामुळे दादजी बिन रामचंद्र, मौजे खडांवे या शेतकरी गृहस्थाने ज्ञानोदय कर्त्यास 'शेतीच्या विक्रमी उत्पादनास बक्षिस का नाही?' या मथळ्याखाली पत्र पाठवून मदत मागितली होती. हे पत्र 1 ऑक्टोबर 1846 च्या अंकात ज्ञानोदयने छापले. 'सरकारच्या प्रकटनाप्रमाणे उत्साह धरून ताग, रेशीम, जवस व साकर (ऊस) पिकवविले. दीड वर्ष उलटून गेले तरी बक्षिस नाही... माल साठवण्यासाठी घेतलेल्या जागेचे भाडे मात्र डोक्यावरती बसले... संपादकांनी मदत करावी.'[13] हे पत्र छापूर संपादक पुढे लिहितात. 'हिमतीने उत्पन्न काढणाराचा आशाभंग करू नये.'[14] असे कंपनी सरकारला ज्ञानोदयने सुनावले होते.

'रयतेचे दुःख निवारण' हा लेख 15 एप्रिल 1845 च्या अंकात छापला. त्यात 'रयतेचा हितेच्छू' लिहितो की पैशाऐवजी धान्याचा वसूल घ्यावयाचे ठरले तर राखणदार, शिपाई व कारकून फार ठेवावे लागतील. त्यातही लबाडी व दगलबाजी होण्याचा संभव आहे... लोकांनी धान्याची मळणी झाली की लिपण करून धान्याचे रक्षण करावे. एक वर्षाच्या बेगमीपुरते धान्य वर ठेवावे. योग्य किंमतीस धान्य विकून मग बैल व औजारे विकत घ्यावीत.[15] जमिन महसूलामध्ये वस्तुविनिमय पद्धतीचे दुष्परिणाम काय होती हे सांगून शेतकऱ्यांनी धान्याचे रक्षण करण्यासाठीचे उपाय सुचविलेले दिसतात.

शेतकऱ्यांस उपदेश करण्यासाठी ज्ञानोदयने 1 जानेवारी 1848 च्या अंकात बंगाली जमीनदाराची 'जा' आणि 'ये' ची कथा छापली आहे. एक जमीनदार बिछान्यावर पडून नोकरास शेतावर 'जा' म्हणून सांगे, त्याच्या शेतीचे नुकसान झाले. दुसरा मात्र स्वतः शेतावर जाई, नोकरास 'ये' म्हणून सांगे. त्याच्या शेतात उत्तम पीक आले. म्हणून स्वतः कामे करीत जावे.'[16] अत्यंत महत्त्वाचा उपदेश ज्ञानोदयने केलेला दिसतो. त्यातून शेतकऱ्यांना प्रेरणा मिळते व कष्टाशिवाय पर्याय नाही हे सिद्ध होते.

समाजसुधारणेसाठी अत्यंत महत्त्वाचा लेख 15 जून 1848 च्या अंकात छापलेला आहे. लग्नसंबंधी खर्च व मुलीचे वय यांविषयी लेखात असे म्हटले आहे की, 'आपले लोक लग्नात मिळकतीपेक्षा जास्त खर्च करतात. आठव्या वर्षी मुलीचे लग्न करण्याची चालही अयोग्य होय. लहाणपण विद्या शिकण्यात घालवावे व वीस वर्षाचे आत तिचे संमतीने लग्न करावे. काही लोक स्वार्थाकरिता मुली विकतात. कितीएक म्हातारे पुरूष 9–10 वर्षाच्या मुलींशी लग्न करतात. त्यातून मुलीचे हाल होतात.'[17] रूढी परंपरेने चालत आलेल्या लग्नासंबंधीच्या अनिष्ठ प्रथा या लेखातून दाखविलेल्या आहे. लग्नकार्यामुळे कर्जबाजारी होऊ नये, मुलींना शिक्षण द्यावे, बालविवाहास विरोध करून मुलीच्या लग्नाचे वय 20 वर्ष सांगून तिच्या संमतीने लग्न करण्याचा आदर्श सांगितलेला आहे.

'सरकारने सर्वच प्रजेचे रक्षण करावे पण गरीबगुरीबाकडे सर्वात जास्त लक्ष द्यावे... मोठे लोक आपले सत्तेने गरीबांस त्रासितात... गरीब फार मेहनत करून निर्वाह करतात... देशाची शोभा व समृद्धी त्यांजमुळे असते.'[18] म्हणून रयतेचे रक्षण करण्यासंदर्भात कंपनी सरकारला ज्ञानोदयने सुचविलेले दिसते. अशा स्वरूपाचे लेख, बातम्या, संपादकीय ज्ञानोदयमध्ये सातत्याने छापलेले पहावयास मिळते. त्यामाध्यमातून शेतकरी, प्रजा यांच्यात सुधारणा व्हावी म्हणू ज्ञानोदयने विचार मांडलेले दिसतात.

## *निष्कर्ष व समारोप*

वृत्तपत्रे ही ज्ञान, मनोरंजन व जागृतीची साधने असतात. 19 व्या शतकातल्या महाराष्ट्रातील प्रबोधनात त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. 'ज्ञानोदय'ही त्याला अपवाद नाही. मिशनऱ्यांनी सुरू केलेले वृत्तपत्र असल्याने काही वेळा धार्मिक अभिनिवेश त्यातून व्यक्त झाला. परंतु एकंदरीत येथील समाजाच्या हिताचा विचार करून प्रबोधनाचे कार्य करण्याची विधायक भूमिका 'ज्ञानोदय'ने पार पाडली. शेती व दुष्काळासंदर्भात अनेक बातम्या, पत्रे, लेख यांच्या माध्यमातून ज्ञानोदयने विपुल लेखन केले. 1842 मध्ये 'ज्ञानोदय'ची स्थापना झाल्यापासून 1850 पर्यंतच्या काळात ज्ञानोदयने दुष्काळ व शेतीविषयक जे विचार मांडले त्यांचा मागोवा मूळ अंकांच्या अभ्यासावरून प्रस्तुत शोधनिबंधात घेतलेला आहे. 'ज्ञानोदय'ची दुष्काळ व शेतीविषयक कामगिरी ऐतिहासिक महत्त्वाची होती, असे या अभ्यासावरून म्हणता येईल.

## *तळटीपा व संदर्भ – साहित्य – सूची*


- विनायक कृष्ण जोशी व रामचंद्र केशव लेले, वृत्तपत्रांचा इतिहास, खंड पहिला, सन 1780 ते 1880, योगवाणी प्रकाशन, मुंबई 1951
- डॉ. राजा दिक्षित, 19 व्या शतकातील महाराष्ट्र : मध्यम वर्गाचा उदय, डायमण्ड पब्लिकेशन, पुणे 2009

• हिवाळे भा. पा. (संपा.), ज्ञानोदयची पहिली 100 वर्षे, 1842 ते 1941, ज्ञानोदय बोर्ड ऑफ मॅनेजमेंट, मुंबई 1942.
1. ज्ञानोदय, अमेरिकन मराठी मिशन प्रेस, अहमदनगर, जून 1842, पृ. 1
2. प्रा. सुधीर शर्मा व विजया पुणेकर (संपा.), 'ज्ञानोदया'च्या पानातुन महाराष्ट्राच्या प्रबोधनाचा मागोवा (1842 ते 1992), ज्ञानोदय ट्रस्ट, अहमदनगर, 1997, पृ. पाच वर उद्धृत.
3. ज्ञानोदय, 1 जानेवारी 1847, पृ. 15.
4. ज्ञानोदय, 20 डिसेंबर 1845, पृ. 396—97
5. ज्ञानोदय, 15 सप्टेंबर 1845, पृ. 285—87
6. ज्ञानोदय, 15 सप्टेंबर 1846, पृ. 285
7. ज्ञानोदय, 15 ऑक्टोंबर 1846, पृ. 320
8. ज्ञानोदय, 15 सप्टेंबर 1847, पृ. 398
9. ज्ञानोदय, 15 एप्रिल 1847, पृ. 124—125
10. ज्ञानोदय, 15 जानेवारी 1848, पृ. 32
11. ज्ञानोदय, 16 फेब्रुवारी 1848, पृ. 63
12. ज्ञानोदय, 16 मार्च 1846, पृ. 95—96
13. ज्ञानोदय, 1 ऑक्टोबर 1846, पृ. 299
14. कित्ता
15. ज्ञानोदय, 15 एप्रिल 1845, पृ. 121
16. ज्ञानोदय, 1 जानेवारी 1848, पृ. 14—15
17. ज्ञानोदय, 15 जून 1848, पृ. 185
18. ज्ञानोदय, 15 ऑगस्ट 1847, पृ. 292

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org